# राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण ५ वा मजला, सीडको भवन सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई, पिनकोड ४००६१४
दुरध्वनी : ०२२ - ६५२१३४४४
Email - directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र. राज्य योजना/१२८१/२०१८

दिनांक :३०.०७.२०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व)

विषय : शबरी आदिवासी घरकुल योजना सन २०१७-१८ ते २०१९-२० व पारधी आवास योजना सन २०१७-१८.

संदर्भ : १) या कार्यालयाकडील पत्र जा. क्र. राज्य योजना/१२९५/२०१८, दि. १९ मार्च, २०१८
२) कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांचेकडील पत्र नस्ती क्र. घकुयो-२०१८/प्र.क्र.२३१/का.१७, दिनांक २५ जुलै, २०१८

शबरी आदिवासी घरकुल योजनेकरीता पात्र लाभार्थ्यांची यादी आदिवासी विकास विभागाकडून शासन पत्र दिनांक ०६.१२.२०१७ अन्वये जिल्हावार उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर यादी पूर्णत: वापरण्यात आल्यानंतर काही जिल्हयांकडे सदर यादीव्यतिरिक्त शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या वेळोवेळी निश्चित केलेल्या निकषानुसार पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. अशा लाभार्थ्यांना लाभ देता येईल किंवा कसे? तसेच पारधी आवास योजनेकरीता देखील अशा प्रकारची यादी आदिवासी विकास विभागाने उपलब्ध करुन दयावी, याबाबत या कार्यालयाकडून संदर्भ क्र. १ अन्वये आदिवासी विकास विभागाकडे मार्गदर्शन मिळणेबाबत कळविणेत आलेले होते.

संदर्भ क्र. २ नुसार, कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांनी यादीव्यतिरिक्त पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा व तालुकास्तरावर प्राप्त झाले असतील तर अशा लाभार्थ्यांना शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लाभ देण्यास हरकत नसलेबाबत कळविले आहे. तसेच पारधी जमातीच्या लाभार्थ्यांची अशी यादी उपलब्ध नसल्याने शासनस्तरावरुन लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देता येणार नसलेबाबत देखील कळविले आहे.

तरी आपण आपले स्तरावरुन शबरी आदिवासी घरकुल योजना व पारधी आवास योजना अंतर्गत पात्र लाभार्थी निवडीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

सोबत : वरीलप्रमाणे

धनंजय माळी (भा.रा.से.)
संचालक,

प्रत : प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी